जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/०४/२०२४
## दि.१२/०४/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ३६०/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,मो.वा.का.कलम १८४ |
| **फिर्यादी** | गोपाल घायाळ वय ३४ वर्श रा हॉटेल राजयोगचे मागे,खंडाळे माथा ता शिरूर जि पुणे |
| **आरोपीत** | एक अज्ञात कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि १२/०२/२०२४ रोजी स.१०/३० वा चे सुमा. मौजे वाघोली ता हवेली जि पुणे गावचे हददीत जमिन गट नं ३४७ मधील क्रिषा टान्सपोर्ट गाडे वस्ती वाघोली ता हवेली जि पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मावस भाऊ मुरलीधर अंकुश तेजनकर वय ४२ वर्षे गाडेवस्ती वाघोली हा नमुद ठिकाणी माल भरणे करीता बंद स्थितीत उभे असलेले ट्रक जवळ उभा असताना त्यास नमुद अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील कार ही भरधाव वेगाने ,निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी मावस भाऊ यास धडक देवुन ट्रक व कार मध्ये चेपुन अपघात करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार शिवले मो.नं.८४८४८४८४११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ७३/२०२४,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६० वर्षे, रा.कसबा पेठ,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २९/११/२०२३ रोजी ते आज रोजी पर्यंत च्या दरम्याने भारती भवन, अलका टॉकीजजवळ पुणे, भारती विद्यापीठ पुणे व परीसरात |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांने फिर्यादी यांना नमुद ठिकाणी भेटून तुमच्या मुलाचे एम.बी.बी.एस. चे ॲडमीशन करुन देतो असे आश्वासन देवुन त्याचे बँक खातेचा सही केलेला कोरा चेक देवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन ॲडमीशन,व इतर वेगवेगळ्या कारणांकरीता वेळोवेळी फिर्यादी कडुन त्याचे बँक खात्यावर ऑनलाईन बँकीग द्वारे ५८,७९,७५२/- रुपये व रोख स्वरुपात १०,९०,९९०/- रुपये असे एकुण ६९,७०,७४२/- रुपये एम.बी.बी.एस. ॲडमीशनचे नावाखाली स्विकारुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.निंबाळकर मो.नं.९९२२९२०७७१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २२६/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ सह आय टी ॲक्ट ६६ डि |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६४ वर्षे रा.वडगाव बुाा पुणे |
| **आरोपीत** | एक मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०१/२०२४ रोजी ते आजपावेतो रहाते घरी |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना एक मोबाईल धारक यांनी आयपीओ मध्ये गुंतवणुक केल्यास चांगला नफा मिळेल असे अमिष दाखवुन फिर्यादी यांना यांचे  बँक खाते मधुन ३०,००,०००/- रुपये भरण्यास भाग पाडुन फिर्यादीची अर्थिक फसवणुक केली आहे |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विजय कुंभार मो नं ९९२२९४७३०४ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २८९/२०२४,भादविक ४१९, ४२० माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३८ वर्षे,रा.हांडेवाडी रोड,हडपसर पुणे, |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०१/२०२४ ते दि. २५/०२/२०२४ रोजीचे दरम्यान घरी असताना ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद वेळी घरी असताना एका अनोळखी व्यक्तीने फिर्यादी यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंट मेसेज करुन व्हॉटसअॅप ग्रुप मध्ये अॅड करुन एक लिंक मध्ये जॉईन होण्यास सांगितले व फिर्यादी यांना शेअर्स बद्दल माहीती देऊन फिर्यादी यांना एक अॅपक्लीकेशन डाउनलोड करण्यास सांगुन रजिस्ट्रेशन करण्यास सांगितले. व वेगवेगळ्या त्यांचे बॅक खात्यावर पैसे पाठविण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची एकुण २४,००,०००/- रु.ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पंतगे मो.नं.९८२२२२४९१२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २२७/२०२४,भादविक ४२०,४१९,३४ सह आय टी अॅक्ट ६६ (डि) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४२ वर्षे रा.वडगाव बुा पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २२/०१/२०२४  ते दि.२६/०२/२०२४ रोजी रहाते घरी |
| **तपशिल** | यातील अज्ञात मोबाईल धारक याने फिर्यादी यांना शेअर ट्रेडींग मध्ये भरघोस ऩफा मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन फिर्यादी यांना १७,६५,०००/रु. भरण्यास भाग पाडुन फिर्यादीची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विजय कुंभार मो नं ९९२२९४७३०४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**